**अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांकरिता नोंदणीकृत पदवीधरांचे नाव मतदार यादीत (Voter List) समाविष्ट करणेबाबत**

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१

## NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON–425001

# निवडणूक शाखा

## नोंदणीकृत पदवीधरांची मतदार यादी

## (सन २०००, २००५ आणि २०१० पदवीधरांसाठी)

# जाहीर प्रकटन

दि.०१ मार्च, २०१७ पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ अंमलात आलेला असून त्या अनुषंगाने विविध प्राधिकरणांचे गठन करण्याची प्रक्रिया उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाव्दारे सुरु करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून कलम २८ (२) (न) अन्वये नोंदणीकृत पदवीधर गटाने त्यांच्यामधून निवडून द्यावयाच्या १० नोंदणीकृत पदवीधरांसाठी निवडणूक घेतली जाणार आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या पदवीधरांच्या गटाच्या (Collegium of Graduates of the University) अनुषंगाने निर्वाचक गण (Electoral Roll) तयार करण्यासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांची नोंदणी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार दि.15/06/2017 रोजी जा.क्र.उमवि/2/निवडणूक/14/2017 अन्वये जाहिर प्रकटन प्रसिध्द करण्यात आलेले आहे. या जाहिर प्रकटनानुसार उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदवीधरांनी आपले नाव विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंद वहीमध्ये नोंदविण्याचे कामकाज सुरु केलेले आहे.

या प्रकटनाव्दारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, 2016 मधील कलम 131 (5) मधील तरतूदी प्रमाणे, अधिसभेच्या सदस्यांच्या कलम 28 च्या पोट कलम 2 च्या खंड (न) अन्वये अधिसभेच्या सदस्यांच्या निवडणुकीकरिता तयार करावयाचा मतदार यादीमध्ये नाव नोदविण्यास इच्छुक असलेल्या **(सन 2000, 2005 व 2010 मध्ये नोंदणी केलेले पदवीधर)** नोंदणीकृत पदवीधरांना विद्यापीठाकडे अर्ज करणे आवश्यक आहे. त्यासाठी नोंदणीकृत पदवीधरांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर www.nmu.ac.in/election या link वर असलेल्या विहित नमून्यात ऑनलाईन माहिती भरावी. भरलेली माहिती अचूक असल्याची खात्री करावी. भरलेल्या माहितीच्या अनुषगाने तयार झालेल्या अर्जाची प्रत व पोच पावती डाऊनलोड करुन प्रिंट घ्यावी. प्रिंट झालेल्या अर्जावर स्वतःची स्वाक्षरी करावी. तसेच अर्जासोबत स्वतः स्वाक्षांकीत केलेल्या निवासाचा पुरावा जोडावा. सदर अर्ज, पोच पावती आणि आवश्यक कागदपत्र, विद्यापीठाने विहित केलेल्या केंद्रांवर जमा करावेत व संबंधीत केंद्राकडून अर्ज जमा केल्याची पोच पावती घ्यावी.

१) Online अर्ज भरण्यासाठी अंतिम दिनांक ०५ जुलै,२०१७ राहील. तसेच सदर अर्जाची छापील प्रत व आवश्यक कागदपत्र वरील मुद्दा क्र.०४ मध्ये नमूद केलेल्या केंद्रावर दि.१९/०६/२०१७ पासून दि.०६/०७/२०१७ पर्यंत कार्यालयीन दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत जमा करावेत.

...२

२) ज्या नोंदणीकृत पदवीधरांनी आपले नाव बदललेले असेल, त्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेले स्वयं-घोषणापत्र भरुन देणे आवश्यक आहे.

३) नोंदणीकृत पदवीधरांनी आपल्या अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत.

अ) निवासाचा पुरावा (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना ) यापैकी एक

ब) नाव बदलले असल्यास स्वयं-घोषणापत्र व नाव बदलाबाबतचा एक पुरावा (लग्नपत्रिका/विवाह नोंदणी प्रमाणपत्र/शासन राजपत्र इ.)

४) दि. ०६/०७/२०१७ पर्यन्त ज्या नोंदणीकृत पदवीधराचा मतदार यादीत नाव येण्यासाठी अर्ज प्राप्त होईल, त्याच पदवीधरांचा सन २०१७ मध्ये होणाऱ्या नोंदणीकृत पदवीधरांच्या दहा जागांच्या निवडणुकीसाठी नोंदणीकृत पदवीधर मतदार म्हणून मतदार यादीत समावेश केला जाईल.

**नोंदणीकृत पदवीधर गटाच्या निर्वाचक गणामध्ये मतदार म्हणून नोंद होण्यासाठी** दि.०६/०७/२०१७ रोजी दुपारी ०३.०० वाजेनंतर विद्यापीठ कार्यालयास अथवा वरील केंद्रावर अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

५) **सन २०१५ मध्ये ज्या पदवीधरांनी आपले नाव नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदवहीत नोदविणेसाठी तसेच मतदार म्हणून मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्यासाठी अर्ज केला असेल व विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या वैध अर्जदारांच्या यादीत त्यांच्या नावांचा समावेश असेल अशा पदवीधरांना विद्यापीठाचे निदेश क्र.०५/२०१७ नुसार कोणताही अर्ज भरण्याची आवश्यकता नाही, त्यांची नावे मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यात येतील.**

तथापि, सदर पदवीधरांचा निवासाचा पत्ता बदललेला असल्यास त्यांनी वरील मुद्दा क्र.०७ (अ) मधील पुराव्यासह आपला स्वतंत्र अर्ज विद्यापीठाच्या वरील नमूद केंद्रावर जमा करावा.

६) नोंदणीकृत पदवीधर मतदानासाठी मतदान केंद्रांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

७) **ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी सूचना :**

१) ऑन लाईन अर्ज भरतांना पदवीधराने प्रथम अर्ज भरण्यासंबंधीच्या सर्व सूचना व्यवस्थित वाचाव्यात.

२) Online अर्ज भरण्यापूर्वी पदवीधरांनी आपला फोटो JPG Format मध्ये व 96 to 150 dpi मध्ये स्कॅन करावा.

८) अपूर्ण असलेले अर्ज नस्तीबध्द करण्यात येतील व त्या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

९) निदेश, निवडणूक कार्यक्रम, मतदार याद्या इ. बाबी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर www.nmu.ac.in/election या link वर वेळोवेळी प्रसिध्द केल्या जातील व त्याबाबतची सूचना बातमीरुपाने वृत्तपत्रातून दिली जाईल. वेळोवेळी विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील माहिती सर्व संबंधितांनी ज्ञात करुन घेणे आवश्यक आहे.

तरी संबंधितांनी वरील बाबीची नोंद घेवून विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांची निवडणूक प्रक्रिया सुरळितपणे पार पाडण्यास सहकार्य करावे, ही विनंती.

जा.क्र. : उमवि/२/निवडणूक/१९/२०१७
दिनांक : १९/०६/२०१७

**(प्रा. अ. बा. चौधरी)**
प्र. कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

पत्र पेटी क्र. : ८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र.०२५७-२२५७२११, १२, १४ आणि २२५७३४८ फॅक्स क्र. :०२५७-२२५८४०३, ४०६
Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon Telephone Nos. : 0257-2257211, 12 , 14 & 2257348
Fax Nos. : 0257-2258403, 406 e-mail Id : registrar@nmu.ac.in & election2017@nmu.ac.in